


४ महिने तपास, ११ खात्यांचा शोध अन् शेअर मार्केटच्या अमिषातून फसलेल्या तरुणास परत मिळवून दिले ४२ लाख रुपये.

शेअर मार्केटच्या अमिषातून ४२ लाख १० हजार रुपयास फसलेल्या मंद्रूपच्या तरुण व्यावसायिकास सोलापूर ग्रामीण पोलिसांनी चार महिने तपास करून ती रक्कम परत मिळवून दिली. न्यायालयाच्या आदेशानंतर पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलिस अधीक्षक प्रितम यावलकर यांनी त्या तरुणास तेवढ्या रकमेचा धनादेश दिला.

शेअर मार्केटबद्दल माहिती असलेल्या फिर्यादी तरुणाच्या मोबाईलवर सप्टेंबर २०२४ मध्ये मोतीलाल ओस्वाल इन्वेस्ट क्लबच्या नावाची लिंक आली. सायबर गुन्हेगारांनी बनावट लिंक पाठविल्याची माहिती नसलेल्या तरुणाने सायबर गुन्हेगारांच्या बनावट व्हॉट्स ॲप ग्रुपवरील चर्चा पाहून एकाच महिन्यात थोडेथोडे करुन तब्बल ४२ लाख रुपये गुंतवले. फिर्यादीस गुंतवलेल्या रकमेवर एक कोटी २० लाखांचा परतावा मिळणार असे व्हर्चुअली दिसत होते. तेवढी रक्कम परत मिळावी म्हणून तरुणाने रक्कम गुंतवणे बंद केले. त्यावेळी ज्यादा पतरावा सोडा स्वतः गुंतवलेल्या रकमेतील एक रुपयाही परत मिळाला नाही. त्यानंतर तरुणाने मंद्रूप पोलिसांत फिर्याद दिली. तो गुन्हा पुढे सोलापूर तालुका पोलिसांत वर्ग झाला.

फिर्यादीने पोलिस अधीक्षकांची भेट घेऊन हकीकत सांगितली. त्यानंतर गुन्ह्याचा तपास सायबर पोलिसांकडे सोपविला. डिसेंबरपासून सायबर पोलिसांनी तपास करुन मध्यप्रदेशातील उज्जैन येथे जाऊन आले. फिर्यादीची रक्कम ज्या खात्यात वर्ग झाली, त्यात एक रुपयाही नव्हता. त्यानंतर सायबर पोलिसांनी तांत्रिक तपास करून ११ खात्यांचा शोध घेतला. त्यातील रक्कम बँकांना पत्रव्यवहार करून थांबवली. रक्कम परत मिळाल्यावर फिर्यादीने पोलिसांचे आभार मानले.